# मराठी-वाङ्मय-मंडळ

# ‘मराठी भाषा-संवर्धन पंधरवडा’

# अहवाल

(शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४)

## 'नाटककाराशी मुक्तसंवाद'

गुरुवार, दिनांक ०३ ऑगस्ट, २०२३ रोजी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील मराठी-वाङ्मय-मंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४मधील पहिला उपक्रम म्हणून 'नाटककाराशी मुक्तसंवाद' ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्राजक्त देशमुख, उपप्राचार्या विद्या पाटील, मराठी-विभागप्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, महाविद्यालयातील इतर अध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी इतर महाविद्यालयांतील शिक्षक आणि विद्यार्थीदेखील उपस्थित होते. ह्या कार्यक्रमात प्रथमवर्ष कला शाखेच्या 'मराठी वाङ्मय' ह्या विषयाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या 'संगीत देवबाभळी' ह्या नाटकाचे लेखक आणि दिग्दर्शक प्राजक्त देशमुख ह्यांची मुलाखत घेण्यात आली.

'संगीत देवबाभळी' ह्या नाटकासंबंधी विद्यार्थ्यांनी काही कलाविष्कार सादर केले. द्वितीयवर्ष कलाशाखेची विद्यार्थिनी सिद्धी वेंगुर्लेकर हिने गोविंदस्वामी आफळे ह्यांनी लिहिलेले 'रखुमाई रुसली' हे गाणे सादर केले. तसेच तृतीयवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनी आर्या मोगरे, उर्षला कांबळे आणि तनुजा पाटील ह्यांनी 'संगीत देवबाभळी' ह्या नाटकातील एका प्रसंगाचे अभिवाचन केले.

तृतीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी सानिका म्हसकर आणि पदव्युत्तर विज्ञान शाखेची विद्यार्थिनी तन्वी गुंडये ह्यांनी 'संगीत देवबाभळी'ची अर्पणपत्रिका सादर करून प्राजक्त देशमुख ह्यांचा परिचय करून दिला व त्यांच्याशी 'संगीत देवबाभळी'विषयी सहजसुंदर संवाद साधला.

ह्या वेळी मुलाखतकारांनी विचारलेल्या विद्यार्थ्यांच्या मनांतील प्रश्नांना प्राजक्त देशमुख ह्यांनी मनमोकळेपणाने उत्तरे दिली. तसेच मुलाखतीदरम्यान त्यांनी आपल्या काही कविताही सादर केल्या. नाटकातील काही प्रसंगांमागील विचार, काही रोचक आठवणी, नाटकाचा आशय, त्यातील पात्रचित्रण, संगीत, नेपथ्य, प्रकाशयोजना असे सर्वच घटक ह्यांविषयी सविस्तर चर्चा झाल्यामुळे नाटक न पाहिलेले आणि पाहिलेले अशा सर्वच प्रेक्षकांमध्ये पुन्हा नाटक पाहण्याची उत्सुकता निर्माण झाली. थेट लेखकाशीच संवाद घडल्यामुळे अभ्यासाच्या दृष्टीने ह्या मुलाखतीचा आम्हांला उपयोग होईल, अशी प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी दिली.

तृतीयवर्ष कला शाखेतील तनुजा पाटील ह्या विद्यार्थिनीने संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाची सुरुवात संत तुकारामांच्या 'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने' ह्या अभंगाने झाली. प्रथमवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी सिद्धी वेंगुर्लेकर हिने हा अभंग सादर केला. त्यानंतर मराठी-वाङ्मय-मंडळाची विद्यार्थी-समन्वयक उर्षला कांबळे ह्या तृतीयवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनीने उपस्थित प्रेक्षकांना मराठी-वाङ्मय-मंडळाच्या वाटचालीविषयी थोडक्यात माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राजक्त देशमुख ह्यांचे महाविद्यालयाच्या उपप्राचार्या विद्या पाटील ह्यांच्या हस्ते फुलझाडाचे रोप देऊन स्वागत करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२२-२३मध्ये मराठी वाङ्मय हा विषय घेऊन रुपारेलमध्ये पहिली आलेली विद्यार्थिनी वनश्री राडये हिचे प्राजक्त देशमुख ह्यांच्या हस्ते ग्रंथभेट-कुपन देऊन कौतुक करण्यात आले.

मुलाखतीनंतर तन्वी गुंडये, शुभदा साळगावकर, आमोद भिडे ह्या विद्यार्थ्यांनी  आणि रुचिका मोहिते ह्या इंग्रजी विभागातील अध्यापकांनी तयार केलेल्या भेटवस्तू प्रमुख पाहुण्यांना देण्यात आल्या. ह्या सर्वांचे तसेच मनीष पाताडे ह्या विद्यार्थ्याने 'संगीत देवबाभळी'विषयी काढलेल्या सुंदर रांगोळीचेही पाहुण्यांनी कौतुक केले. द्वितीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी उत्कर्षा सिंह हिने सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

ह्या कार्यक्रमाला रुपारेल महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी ह्यांच्या सोबत महर्षी दयानंद महाविद्यालय, टी. के. टोपे रात्र-महाविद्यालय ह्या महाविद्यालयांतील शिक्षक तसेच ह्या दोन महाविद्यालयांतील आणि एसआयईएस महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी ह्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला.

## ‘कथा आणि कादंबरी : कथनरूपांचा परिचय’

डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील मराठी-वाङ्मय-मंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४मधील दुसरा उपक्रम म्हणून 'कथा आणि कादंबरी : कथनरूपांचा परिचय' ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम सोमवार, दि. ११ सप्टेंबर ,२०२३ रोजी नवीन इमारतीतील सभागृहात सकाळी १०:४५ ते दुपारी १२:४५ या वेळेत आयोजित करण्यात आला. ह्या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे मराठी-संशोधन मंडळाचे संचालक डॉ. नीतीन रिंढे, डी. जी. रुपारेल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के, उपप्राचार्या नीता ताटके, मराठी-विभागप्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, महाविद्यालयातील इतर अध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये डॉ . नीतीन रिंढे यांनी मुंबई विद्यापीठाच्या द्वितीयवर्षाच्या मराठीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या कथनसाहित्य या प्रकारातील कथा आणि कादंबरी या कथनरूपांविषयी सैद्धान्तिक मांडणी केली.

कथनरूपांची ओळख करून देऊन, डॉ. नीतीन रिंढे सरांनी कथा आणि गोष्ट या दोघांमधला फरक समजावून सांगितला. तसेच कथा व कादंबरी या अर्वाचीन साहित्यप्रकारांविषयी त्यांच्या मूलघटकांच्या संदर्भातून सविस्तर चर्चा करत, कथा आणि कादंबरी या दोन कथनरूपांतील फरक उदाहरणांसह स्पष्ट केला. कादंबरी या साहित्यप्रकारात परदेशांतील लेखकांनी नवीन तंत्रे वापरून केलेल्या प्रयोगांचीही त्यांनी उदाहरणे दिली. कल्पित आणि वास्तव यांचे मिश्रण आधुनिक काळातील कादंबरीत कसे दिसते याविषयीही 'कोसला' व इतर कादंबऱ्यांची उदाहरणे देऊन त्यांनी चर्चा केली. तसेच आधुनिकतावादी, वास्तववादी आणि इहवादी कथनसाहित्याबद्दलही त्यांनी थोडक्यात परिचय करून दिला. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी सविस्तर उत्तरे दिली.

व्याख्यानाआधी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. नीतीन रिंढे यांचे महाविद्यालयाच्या उपप्राचार्या नीता ताटके यांच्या हस्ते फुलझाडाचे रोप देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्णव चव्हाण या द्वितीयवर्ष कला शाखेच्या विद्यार्थ्याने केले. प्रश्नोत्तरांनंतर मनीष पाताडे या विद्यार्थ्याने पाहुण्यांचे काढलेले रेखाचित्र विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांना भेट दिले. द्वितीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी शुभदा साळगावकर हिने कार्यक्रमासाठी आलेले प्रमुख पाहुणे, प्रभारी प्राचार्य, उपप्राचार्या, सर्व उपस्थित अध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## ‘लेखक-भेट : 'पुरोगामी' या कादंबरीचे लेखक श्री. राकेश वानखेडे ह्यांची मुलाखत’

शनिवार, दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी महर्षी दयानंद महाविद्यालय, डी. जी. रुपारेल महाविद्यालय, सेवा सदनचे आर. के. टी. महाविद्यालय आणि के. एम. सी. महाविद्यालय  या चार महाविद्यालयांच्या मराठी विभागांनी 'लेखक-भेट : 'पुरोगामी' या कादंबरीचे लेखक श्री. राकेश वानखेडे ह्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम' हा उपक्रम दुपारी १ ते दुपारी २:३० या वेळेत झूम मीट या प्रातिभासिक माध्यमातून आयोजित केला होता.

मुंबई विद्यापीठाच्या, तृतीयवर्ष कला शाखेच्या मराठी वाङ्मय, सत्र ५, विषय ८ - 'आधुनिक मराठी साहित्य' या विषयाच्या अभ्यासक्रमात राकेश वानखेडे लिखित 'पुरोगामी' ही कादंबरी समाविष्ट असल्याने त्यांची मुलाखत घेण्यात आली. ही मुलाखत चारही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतली.

'पुरोगामी' ही कादंबरी लिहितानाची लेखक म्हणून असलेली राकेश वानखेडे यांची भूमिका, कादंबरीतील पात्रचित्रण, कथानकाचे तंत्र, या कादंबरीमागचा लेखकाचा विचार, प्रेरणा, 'पुरोगामी' ही कादंबरी ज्या दोन चळवळींविषयी भाष्य करते त्या आंबेडकरवाद व मार्क्सवाद चळवळींविषयी कादंबरीत आलेले चित्रण अशा अनेक मुद्द्यांवर विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले. राकेश वानखेडे यांनी त्यांना मोकळेपणाने सविस्तर उत्तरे दिली. तसेच या मुलाखतीदरम्यान पुरोगामी चळवळ, पुरोगामित्व म्हणजे काय, आधुनिक कादंबरी म्हणजे काय, ती कशी असावी, तिची वाटचाल, कादंबरी या अर्वाचीन साहित्यप्रकाराचे स्वरूप, तंत्र व व्याप्ती या नि अशा अनेक विषयांवर त्यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त चर्चा केली.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक महर्षी दयानंद महाविद्यालयातील साहाय्यक प्राध्यापक आशा कुंभार यांनी केले. लेखकांचा परिचय महर्षी दयानंद महाविद्यालयातील विद्यार्थी प्रसाद कुंभार याने करून दिला. कार्यक्रमाच्या शेवटी के. एम. सी. महाविद्यालयातील मराठी-विभागप्रमुख डॉ. भाऊसाहेब नन्नवरे यांनी राकेश वानखेडे यांचे व सर्व सहभागींचे आभार मानले.

## 'मांदियाळी : ०१'

(२०१७-२०१८ ते २०२२-२०२३ ह्या वर्षांतील मराठी विभागातील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन)

डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील मराठी-वाङ्मय-मंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४मधील तिसरा उपक्रम म्हणून 'मांदियाळी : ०१'(२०१७-२०१८ ते २०२२-२०२३ ह्या वर्षांतील मराठी विभागातील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन) ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम शनिवार, दि. १४ ऑक्टोबर,२०२३ रोजी २ विज्ञान ह्या सभागृहात सकाळी ११:३० ते दुपारी ३:३० या वेळेत आयोजित करण्यात आला. ह्या कार्यक्रमामध्ये २०१७-२०१८ ते २०२२-२०२३ ह्या वर्षांतील मराठी विभागातील माजी विद्यार्थी, मराठी-विभागप्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. अनघा मांडवकर आणि तृतीयवर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये माजी विद्यार्थ्यांनी ते सध्या कार्यरत असलेल्या क्षेत्राबाबत माहिती देत पुढे काय करण्यास इच्छुक आहेत हे सांगितले. तसेच त्यांना उपलब्ध झालेल्या, होत असलेल्या अनेक व्यावसायिक संधीची आजी विद्यार्थ्यांना तसेच विभागातील दोन्ही शिक्षकांना सविस्तर माहिती दिली. त्या – त्या क्षेत्रासाठी उपयुक्त असलेल्या क्षमता कशा प्रकारे अवगत करायच्या व त्या कशाप्रकारे वापरायच्या हे देखील सांगितले.

त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या मराठी विभागात, मराठी वाङ्मय मंडळातर्फे कोणकोणते उपक्रम राबवायला हवेत, यावर माजी विद्यार्थ्यांनी अनेक नवनवीन कल्पना सुचवल्या. स्पर्धा परीक्षेसाठी अभ्याससत्र, भाषाविज्ञानासारख्या अभ्यासशाखांची अधिक माहिती करून देणारी सत्रे, इ. प्रकारची सत्रे आयोजित केली जाऊ शकतात. यासाठी विभागातील शिक्षक तसेच माजी विद्यार्थी यांच्या सहाय्याने ती कशाप्रकारे करावी यावर थोडक्यात चर्चा करण्यात आली. या एकंदरीत चर्चेवर विभागातील दोन्ही शिक्षकांनी आपापल्या प्रतिक्रिया दिल्यावर माजी विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिती जाधव ह्या तृतीयवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनीने केले. तसेच तृतीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी जुईली मोहिते सर्वांचे आभार मानले. आणि सावनी गोगटे ह्या माजी विद्यार्थिनीने पसायदान म्हणत कार्यक्रमाची सांगता केली.

## ‘मराठी भाषा-संवर्धन पंधरवडा’

(शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३)

डी. जी. रुपारेल महाविद्यालयात दिनांक १५ जानेवारी, २०२४ ते दिनांक २८ जानेवारी, २०२४ दरम्यान मराठी वाङ्मय मंडळातर्फे मराठी भाषासंवर्धन-पंधरवडा साजरा करण्यात आला. मराठी वाङ्मय मंडळाने आयोजित केलेल्या मराठी-भाषासंवर्धन पंधरवड्यातील कार्यक्रमांचे इतिवृत :

## ग्रंथप्रदर्शन

मराठी वाङ्मय मंडळाने आयोजित केलेल्या मराठी-भाषासंवर्धन पंधरवड्यातील कार्यक्रमांचे उद्घाटन दि. १५ जानेवारी, २०२४.(सोमवार.) सकाळी ११:३० वाजता ग्रंथालयात, ‘ग्रंथप्रदर्शन’ मांडून करण्यात आले. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन रुपारेलचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के सर यांच्या हातून केले गेले. ग्रंथप्रदर्शनाच विषय ‘साने गुरुजी आणि आचार्य अत्रे यांचे साहित्य’ असा होता.

प्रदर्शनाची सुरुवात जान्हवी पाटील ह्या प्रथमवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनीने देह देहाचे मंदिर ही प्रार्थना सादर करून केली. ह्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन तनुजा पाटील ह्या तृतीयवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनीने केले. सदर कार्यक्रमाला प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के, उपप्राचार्या डॉ. नीता ताटके, उपप्राचार्या विद्या पाटील, मराठी विभाग-प्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, ग्रंथालय विभाग-प्रमुख अरविंद गणवीर तसेच कार्यालयाचे प्रबंधक प्रकाश पवार, मराठी विभागातील सह-प्राध्यापक डॉ. अनघा मांडवकर, ग्रंथालयातील सर्व सहकारी आणि इतर विभागातील प्राध्यापकही उपस्थित होते.

प्रदर्शनाच्या कार्यक्रमाची सांगता तृतीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी आणि मराठी वाङ्मय मंडळाची विद्यार्थी समन्वयक आदिती जाधव हिने आभार मानून केली. हे ग्रंथप्रदर्शन दि. १५ जानेवारी, २०२४ ते २८ जानेवारी, २०२४ ह्यादिवसांत स. ११:३० ते संध्या. ४:०० वाजता विद्यार्थी तसेच शिक्षकांसाठी खुले होते.

## 'यत्र-तत्र, 'अत्रे' एकमात्र!'

मराठी वाङ्मय मंडळाने आयोजित केलेल्या मराठी-भाषासंवर्धन पंधरवड्यातील दुसरा कार्यक्रम म्हणजे 'यत्र-तत्र, 'अत्रे' एकमात्र!' आचार्य प्रल्हाद केशव अत्रे ह्यांच्या १२५व्या जयंती-वर्षानिमित्त त्यांच्या साहित्य-कला-समाज-क्षेत्रांतील योगदानास अभिवादन करणारा हा कार्यक्रम प्रथमवर्षाच्या आणि द्वितीयवर्षाच्या विद्यार्थ्यांनी  दि. १६ जानेवारी, २०२४. (मंगळवार.) नवीन इमारतीतील सभागृहात दुपारी १२:१५ वाजता सादर केला. ह्या कार्यक्रमाला अत्र्यांचे नातू म्हणजेच शिरीष पै यांचा मुलगा अँड राजेंद्र पै आणि त्यांच्या पत्नी बिना पै तसेच ज्येष्ठ कलाकार श्री. अशोक हांडे सर आणि अत्रे समितीतील काही सदस्य प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे रुपारेल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के सर, उपप्राचार्या डॉ. नीता ताटके, उपप्राचार्या विद्या पाटील, मराठी विभाग-प्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, मराठी विभागातील सह-प्राध्यापक डॉ. अनघा मांडवकर तसेच इतर विभागातील शिक्षकही कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रथमवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनी पृथा आणि इशिता यांनी सर्वांचे स्वागत करून केली. कार्यक्रमात देह देवाचे मंदिर, आजीचे घड्याळ, गुलकंद इत्यादी कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या तसेच मराठी वाङ्मय मंडळ आणि नाट्यविभाच्या मुलांनी मिळून साष्टांग नमस्कार ह्या नाटकातील एका प्रवेशाचे अभिवचन केले. अत्र्यांनी निर्मिती केलेल्या चित्रपटांची ओळख करून देताना यमुना जळी खेळू खेळ कन्हेया का हे गीत सादर झाले तसेच श्यामची आई या त्यांच्या चित्रपटातील भरजरी ग पितांबर या गाण्यावर नृत्य सादर करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटाकडे येताना त्यांच्या एका भाषणाचे वाचन करण्यात आले.

अत्र्यांचे नातू अँड. राजेंद्र पै आणि ज्येष्ठ कलाकार श्री अशोक हांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमातील सर्व कलाकारांचे कौतुक केले. सर्व मान्यवरांचे तसेच प्रेक्षकांचे प्रथमवर्ष कला शाखेचा विद्यार्थी कृष्णदेव निवाते ह्याने आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रमाची श्रेयनामावली :

१. स्वागत आणि प्रास्ताविक - पृथा आणि इशिता

२. प्रार्थना – साक्षी

३. अत्र्यांची माहिती - समीक्षा मोहिते

४. कवितांची माहिती - त्रिशा आणि समीक्षा

५. भावकविता - समता, निधी आणि दिशा

६. विडंबनाची माहिती - निधी आणि सिद्धी

७. विडंबन सादरीकरण- मधुरा, आमोद आणि साक्षी

८. नाटकाची माहिती - दिशा आणि श्रेया

९. सादरीकरण – मराठी वाङ्मय मंडळ आणि नाट्यविभाग

१०. भाषणाची माहिती - पृथा आणि इशिता

११. भाषण - तन्वी परोपकारी

१२. लेखाची माहिती - निधी आणि सिद्धी

१३. लेख – अर्णव चव्हाण

१४. चित्रपटाची माहिती – दिशा ओक आणि श्रेया

१५. चित्रपटातील गीत 'यमुनाजळी खेळू' - चैताली

१६. चित्रपटातील 'भरजरी गं' गीतावर नृत्य - अवनी बोरकर

१७. कार्यक्रमाचा शेवट - त्रिशा आणि समीक्षा

१८. निष्कर्ष - प्रियांका आणि स्वरा

१९. आभारप्रदर्शन – कृष्णदेव निवाते

## ‘स्त्री-नाटककारांचा परिचय’

शुक्रवार, दि. १९ जानेवारी, २०२४ रोजी २ विज्ञान सभागृहात स. ९:०० वाजता स्त्री-नाटककारांचा परिचय हा मराठी वाङ्मय मंडळाने आयोजित केलेल्या मराठी-भाषासंवर्धन पंधरवड्यातील तिसरा कार्यक्रम होय. सदर कार्यक्रमाला डॉ. शीतल पावसकर ह्या संवादक म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे निवेदन प्रथमवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी पृथा हिने केले. रुपारेलगीत सादर

झाले. साक्षी पाताडे ह्या प्रथमवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनीने डॉ. शीतल पावसकर यांची ओळख करून दिली. ह्या कार्यक्रमाला रुपारेलच्या उपप्राचार्या डॉ. नीता ताटके आणि मराठी विभागातील सह-प्राध्यापक डॉ. अनघा मांडवकर उपस्थित होत्या.

डॉ. शीतल पावसकर यांनी नाटक ह्या साहित्य-कलेबद्दल सविस्तर माहिती देत, नाटकातील टप्पे मुद्देसुर सांगितले. व ह्या टप्प्यात येणाऱ्या महत्वाच्या स्त्री-नाटककार, त्यांचे नाटकसृष्ठीला मिळालेले योगदान, पहिल्या स्त्री-नाटककार कोण, त्यांनी लिहिलेल्या नाटकाबद्दल सविस्तर चर्चा केली. पुढे आताच्या काळात महत्वाच्या स्त्री-नाटककार कोण दिसून येतात व नाट्यलेखनाविषयी त्यांनी वापरलेली तंत्र प्रेक्षकांमध्ये तसेच अभ्यासकांमध्ये कशाप्रकारची अभिरुची घडवतात ह्यावर साधक-बाधक चर्चा केली.

त्यानंतर प्रेक्षकांमधून नाटकाप्रमाणे एकांकिका ह्या नाट्यप्रकारात कोणत्या स्त्री-एकांकिकाकर दिसतात व त्यांनी केलेल्या नात्यालेखानाबद्दल प्रश्न-उत्तर सत्र झाले, डॉ. शीतल पावसकर यांनी सर्व प्रश्नांची समाधानकारकउत्तरे दिली. कार्यक्रमाची सांगता प्रथमवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी निधी शिर्के हिने आभार मानून केली.

## ‘आहे वामांगी तरी...

(कथा रुक्मिणीची)’

दिनांक, २० जानेवारी, २०२४ रोजी, २ विज्ञान ह्या सभागृहात दुपारी १२:१५ वाजता तृतीयवर्षाच्या विद्यार्थ्यांनी 'आहे वामांगी तरी...' हा रंगाविष्कार सादर केला. हा मराठी वाङ्मय मंडळाने आयोजित केलेल्या मराठी-भाषासंवर्धन पंधरवड्यातील चौथा कार्यक्रम होय. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के, उपप्राचार्या विद्या पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ. वैशाली जावळेकर, महाविद्यालयतील इतर प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

तृतीयवर्ष कला शाखेतील सुप्रिया पवार ह्या विद्यार्थिनीने कार्यक्रमासाठी उपस्थित प्रेक्षकांचे औपचारिक स्वागत केले. 'आहे वामांगी तरी...', हा कार्यक्रम 'रुक्मिणी' ह्या पौराणिक पात्रावर आधारीत होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिका म्हसकर आणि तनुजा पाटील ह्या तृतीयवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाची सुरुवात अरुणा ढेरे ह्यांच्या 'रुक्मिणी' ह्या कवितेने करण्यात आली. त्यानंतर रुक्मिणीवरील साहित्यावर आधारित सादरीकरणे करण्यात आली. ह्यात नृत्य, नाटिका, कवितेचे अभिवाचन यांसारख्या सादरीकरणांचा समावेश होत. सदर कार्यक्रमामध्ये रुक्मिणीची कथा सांगण्यात आली, तिचा जन्म, स्वयंवर तसेच तिच्या जीवनाशी निगडित इतर घटनांचे सादरीकरण करण्यात आले. तीचं कृष्णाशी असलेले नातं तसेच विठ्ठलाशी असलेले नातेसंबंध यावर प्रकाश टाकला गेला. ह्यातून रुक्मिणी ह्या पात्राचे विविध पैलू उलगडण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला. पुराणातील रुक्मिणी आणि आताची स्त्री यांतील साम्य-भेद यावर मुक्त चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या विद्या पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ. वैशाली जावळेकर तसेच इतर प्राध्यापकांनी कार्यक्रमाबद्दलचे त्यांचे मगोगत व्यक्त केले. तृतीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी आदिती जाधव हिने उपस्थित प्रेक्षकांचे आभार मानून ह्या कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाची श्रेयनामावली :

स्वागत - सुप्रिया पवार

लेखक आणि दिग्दर्शक - तनुजा पाटील आणि सानिका म्हसकर

रुक्मिणीचे प्रेमपत्र - आदिती जाधव (कवी नरेंद्र आणि संत एकनाथ यांच्या रुक्मिणी स्वयंवरातील प्रेमपत्राच्या आधारे लिखित.)

कलाकार -

अभिनय :

रुक्मिणीच्या भूमिकेत - तन्वी गुंडये, उर्षला कांबळे, आर्या मोगरे

सत्यभामेच्या भूमिकेत - जुईली मोहिते.

गायन / कविता वाचन - अदिती पवार, आदिती जाधव, तनुजा पाटील आणि सानिका म्हसकर

नृत्य : आर्या मोगरे, तनुजा पाटील, सानिका म्हसकर

प्रकाश योजना सांभाळणारे - सुप्रिया पवार, श्रुतिका जायभाले आणि तन्वी गुंडये

ध्वनी योजना सांभाळणारे – संघमित्रा गायकवाड

## ‘वारसा-२०२४’

(आंतर-महाविद्यालयीन स्पर्धामहोत्सव)

मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, डी.जी. रुपारेल महाविद्यालय मराठी वाङ्मय मंडळ आयोजित 'वारसा' हा आंतर महाविद्यालयीन स्पर्धा महोत्सव दिनांक २३ जानेवारी आणि २४ जानेवारी, २०२४ या दोन दिवशी मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धा महोत्सवाचे मुख्य प्रायोजक आस्वाद उपाहार व मिठाई गृह होते तसेच सहयोगी प्रायोजक जाई काजळ व व्यास क्रिएशन्स व उपक्रम सहाय्यक म्हणून वस्त्रदा आणि ओशन फिल्म कंपनी ह्यांचे सहकार्य लाभले. ह्यावर्षी स्पर्धा महोत्सवाची संकल्पना बोली अशी होती. ह्या स्पर्धा महोत्सवाचे उद्धाटन डॉ. मीनाक्षी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के व उपप्राचार्य डॉ. नीता ताटके तसेच मराठी विभाग-प्रमुख डॉ. वैशाली जावळेकर उपस्थित होत्या. ज्या स्पर्धा महोत्सवामध्ये मुंबईतील व मुंबई बाहेरील अनेक महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता ह्या स्पर्धा महोत्सवामध्ये एकूण ११ स्पर्धा घेण्यात आल्या. ह्यातील दोन या प्रातिभासिक स्वरूपातील स्पर्धा होत्या. सर्व स्पर्धांच्या अखेरीस सर्वोत्कृष्ट महाविद्यालय व सर्वोत्कृष्ट विद्यार्थी प्रमुख अशी पारितोषिक सुद्धा देण्यात आली.

**विजेते :**

**बोली चित्राची (कल्पक-लेखन स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : भाग्यश्री झगडे

महाविद्यालयाचे नाव : सोनोपंत दांडेकर महाविद्यालय

द्वितीय क्रमांक : आशी साटम

महाविद्यालयाचे नाव : रुईया महाविद्यालय

तृतीय क्रमांक : अनुशा सरमुकादम

महाविद्यालयाचे नाव : एच. आर. महाविद्यालय

**तू चाल पुढं ! (पथनाट्य स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : सोनोपंत दांडेकर महाविद्यालय

**बहुरूपी (एकपात्री-अभिनय स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : प्रथमेश माने

महाविद्यालयाचे नाव : सोनोपंत दांडेकर महाविद्यालय

द्वितीय क्रमांक : ऋषिकेश

महाविद्यालयाचे नाव : टी. के. टोपे महाविद्यालय

तृतीय क्रमांक : ईशा माळकर

महाविद्यालयाचे नाव : आदर्श महाविद्यालय

**जाणतो मराठी ?! (प्रश्नमंजुषा स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : आकांक्षा मोरे

महाविद्यालायचे नाव : एस. एन. डी. टी.

**(चार) शब्दांच्या पलीकडले (चारोळी-लेखन स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : सलोनी माचिवले

महाविद्यालयाचे नाव : आर. ए. पोद्दार महाविद्यालय

द्वितीय क्रमांक : अनिरुद्ध देवगिरे

महाविद्यालयाचे नाव : एच. आर. महाविद्यालय

तृतीय क्रमांक : सई कार्लेकर

महाविद्यालयाचे नाव : डहाणूकर महाविद्यालय

**कथाकथी (कथन स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : सलोनी माचिवले

महाविद्यालयाचे नाव : आर. ए. पोद्दार महाविद्यालय

द्वितीय क्रमांक : दिक्षा सावंत

महाविद्यालयाचे नाव : रुईया महाविद्यालय

तृतीय क्रमांक : ऋतु सावे

महाविद्यालयाचे नाव : एच. आर. महाविद्यालय

**अशी ही बनवाबनवी (रीळ स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : आर्यन पवार आणि प्रसाद जाधव

महाविद्यालायचे नाव : वझे केळकर

**सं'वाद' मराठीतून... (वाद-विवाद स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : प्रथमेश माने आणि सायली शिंदे

महाविद्यालयाचे नाव : सोनोपंत दांडेकर महाविद्यालय

द्वितीय क्रमांक : पियुष पाटील आणि साक्षी पाटील

महाविद्यालयाचे नाव : रुईया महाविद्यालय

तृतीय क्रमांक : प्रसाद शिंदे आणि आदित्य

महाविद्यालयाचे नाव : आर. ए. पोद्दार महाविद्यालय

सर्वोकृष्ट वक्ता : सायली शिंदे

महाविद्यालयाचे नाव : सोनोपंत दांडेकर

**ताल धरू बोली संगे... (लोकनृत्य स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

द्वितीय क्रमांक : जे. के. अकादमी

तृयीय क्रमांक : डहाणूकर

**पालखी लोककाव्याची (लोकसंगीत स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : आदर्श महाविद्यालय

द्वितीय क्रमांक : टी. के. टोपे महाविद्यालय

**भाव अक्षरीचे... (सु-लेखन स्पर्धा)**

प्रथम क्रमांक : मंदार वेले

महाविद्यालयाचे नाव : जे. के. अकादमी

द्वितीय क्रमांक : श्रुति फडतरे

महाविद्यालयाचे नाव : जे. के. अकादमी

तृतीय क्रमांक : मानसी शिंदे

महाविद्यालयाचे नाव : जे. के. अकादमी (पदवी)

**पारितोषिके**

सर्वोकृष्ट महाविद्यालय

विजेते : एच. आर. महाविद्यालय

उपविजेते : सोनोपंत दांडेकर

सर्वोत्कृष्ट विद्यार्थी प्रतिनिधी : एस. एन. डी. टी.

ह्या महोत्सवाच्या बक्षीस समारंभासाठी रुपारेलचे माजी विद्यार्थी व ज्येष्ठ अभिनेते श्री. संजय मोने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच व्यास क्रिएशन्सच्या वैशाली गायकवाड व गायत्री डोंगरे याही उपस्थित होत्या. संजय मोने यांनी त्यांच्या महाविद्यालयीन आठवणी सांगत वाचनाचे महत्त्व किती आहे हे उपस्थित प्रेक्षकांसमोर मांडले. ‘बोली टिकल्या तर भाषा टिकेल,’ असा संदेश देणारा रुपारेलचा ‘वारसा’ स्पर्धामहोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

## स्व-रचित मराठी काव्यस्पर्धा

दरवर्षीप्रमाणे ह्या ही वर्षी मराठी वाङ्मय मंडळाने मराठी भाषासंवर्धन पंधरवड्यानिमित्ताने स्व-रचित मराठी काव्य स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचा कालावधी १४ जानेवारी, २०२४ ते २८ जानेवारी, २०२४ हा होता. ह्या स्पर्धेसाठी ३२ प्रतिसाद आले होते. सदर स्पर्धेचे परीक्षण रुपारेल महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी अस्मिता वांद्रे हिने केले. २६ फेब्रुवारी २०२४ मराठी गौरवदिनानिमित्त 'अभिव्यक्तीच्या अनेक वाटा', संवादक : डॉ. निर्मोही फडके हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला सदर कार्यक्रमात स्व-रचित मराठी काव्यस्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

निकाल :

**प्रथम क्रमांक (विभागून)**

१) सृष्टी बाणे

कवितेचे नाव : काय लिहू महाराज तुमच्या बद्दल ?

इयत्ता : प्रथमवर्ष कला शाखा.

२) स्नेहल बसनाक

कवितेचे नाव : ती

इयत्ता : तृतीयवर्ष कला शाखा

**द्वितीय क्रमांक**

१) देव कोठारे

कवितेचे नाव : बळीराजा

इयत्ता : द्वितीयवर्ष कला शाखा

**तृतीय क्रमांक**

१) आर्या नाईक

कवितेचे नाव : ती आणि श्रृंगार

इयत्ता : प्रथमवर्ष कला शाखा

**उत्तेजनार्थ**

१) प्रणाली मिसाळ

कवितेचे नाव : आईचा गर्भ

इयत्ता : तृतीयवर्ष विज्ञान शाखा

२) यश घाडगे

कवितेचे नाव : जगणं मात्र राहून गेलं !

इयत्ता : द्वितीयवर्ष माहिती-तंत्रज्ञान

## अभिव्यक्तीच्या अनेक वाटा

सोमवार, दि. २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी २ विज्ञान सभागृहात दु. १२:१५ वाजता मराठी-भाषा-गौरवदिनानिमित्त अभिव्यक्तीच्या नाना वाटा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाला डॉ. निर्मोही फडके ह्या संवादक म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे निवेदन तृतीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी जुईली मोहिते हिने केले. रुपारेलगीत सादर झाले. मराठी-वाङ्मय-

मंडळाची समन्वयक आदिती जाधव ह्या तृतीयवर्ष कला शाखेच्या विद्यार्थिनीने डॉ. निर्मोही फडके यांची ओळख करून दिली. ह्या कार्यक्रमाला रुपारेलच्या मराठी विभागातील सह-प्राध्यापक डॉ. अनघा मांडवकर आणि इतर प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. निर्मोही फडके ह्यांनी अभिव्यक्ती म्हणजे काय ? ती कशी करावी ? कोणकोणत्या माध्यमातून केली जावी यावर मार्गदर्शन केले. अभिव्यक्ती करताना लक्षात द्यायच्या गोष्टी, आपल्याकडे कोणत्या प्रकारच्या क्षमता असाव्यात पण त्यांचा उपयोग अभिव्यक्ती करताना कसा करावा ह्याचा आढावा घेत त्यांनी मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी पुढे कोणत्या व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत ह्याची माहिती दिली.

त्यानंतर मराठी-भाषासंवर्धन-पंधरवड्यात आयोजित केलेल्या स्व-रचित मराठी काव्यस्पर्धेचा बक्षीस समारंभ करण्यात आला. डॉ. निर्मोही फडके ह्यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस देण्यात आली.

कार्यक्रमाची सांगता तृतीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी मंजुषा गोरड हिने आभार मानून केली.